CNRNO.MHBU13004062025

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | २४.०२.२०२५ | | |
| नोंद तारीख | : | २४.०२.२०२५ | | |
| निकाल तारीख | : | ०२.०५.२०२६ | | |
| कालावधी | : | वर्ष | म. | दि. |
| | | ०१ | ०२ | ०८ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र.२ चिखली, जिल्हा बुलडाणा**

**पीठासीन अधिकारी श्रीमती एस एच उके न्या.दं.प्र.वर्ग**

**निकाल तारीख ०२.०५.२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्र.६६/२०२५** **निशाणी क्र. ३७**

**गुन्हा क्रमांक ५८४/२०२४,**

**कलम ८५,११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम ३(५) भारतीय न्याय संहीता**

**पोलिस स्टेशन, चिखली**

| | | | |
|---|---|---|---|
| **अभियोग पक्ष / फिर्यादी** | : | | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, चिखली ता. चिखली, जि. बुलडाणा |
| **सरकार पक्षातर्फे** | : | | श्रीमती आर.एस.जाधव (सहा.सरकारी वकील) |
| **आरोपी** | : | १ | अरुण सुभाष मतकर वय ३३ वर्षे, व्यवसाय – मजूरी, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २ | सौ. उषा सुभाष मतकर<br>वय ५६ वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | | ३ | सुभाष नियाराम मतकर<br>वय ६२ वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | | ४ | गजानन सुभाष मतकर<br>वय ३८ वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | | ५ | गणेश सुभाष मतकर<br>वय ३१ वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | | ६ | बाळु हरी गायकवाड,<br>वय ४८ वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | : | | क्र.१,५ रा. पिंपळगांव देवी, ता. मोताळा,ह.मु. सुर्यवंशी अपार्टमेंट, भटार सुरत गुजरात,<br>क्र.२,३, ४ पिंपळगांव देवी, ता. मोताळा, जि. बुलडाणा.<br>क्र.६ रा. भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगांव, |
| **आरोपीतर्फे वकील -** | : | | श्री. डी.व्ही. जाधव |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०५.०७.२०२४ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०५.०७.२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोपत्र दाखल तारीख | २४.०२.२०२५ |
| दोषारोपत्र निश्चीत तारीख | ११.०२.२०२६ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | ११.०२.२०२६ |
| प्रकरण न्यायानिर्णया करीता ठेवले ती तारीख | ०२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२.०५.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | |

<u>आरोपीचा तपशिल</u>

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी. आर. पी प्रमाणे शिक्षेमधून सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अरुण मतकर | सूचनापत्र २१.०१. २०२५ | २४.०२. २०२५ | कलम ११८(१), ११५,(२), ३५२, ३५१(२), (३), सहकलम ३(५) भारतीय न्याय संहीता | निर्दोष | ... | --- |
| २. | उषा मतकर | सूचनापत्र २१.०१. २०२५ | २४.०२. २०२५ | | निर्दोष | ... | --- |
| ३. | सुभाष नियाराम मतकर | सूचनापत्र २१.०१. २०२५ | २४.०२. २०२५ | | निर्दोष | ... | --- |
| ४. | गजानन सुभाष मतकर | सूचनापत्र २१.०१. २०२५ | २४.०२. २०२५ | | निर्दोष | ... | --- |
| ५. | गणेश सुभाष मतकर | सूचनापत्र २१.०१. २०२५ | २४.०२. २०२५ | | निर्दोष | ... | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | बाळु हरी गायकवाड | सूचनापत्र २१.०१. २०२५ | २४.०२. २०२५ | | निर्दोष | ... | --- |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक : ०२.०५.२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२), (३), सह कलम ३(५) प्रमाणे दोषारोप ठेवून चालविण्यात आला.

०२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,**

दिनांक १०.०८.२०२५ रोजी प्रथम खबर उज्वला अरुण मतकर रा. पिंपळगांव देवी, ता.मोताळा, जि. बुलडाणा याने पोलिस स्टेशन चिखली, प्रथम खबर दिली की, तिचे लग्न सन २०११ मध्ये आरोपी क्र.१ सोबत झाले असून तिला एक मुलगी दिव्या व एक मुलगा वंश आहे. सुरवातील एक ते दोन वर्ष तिला आरोपिंनी चांगली वागणुक दिली. तिचे पतीला दारु पिण्याचे व्यसन आहे व तो सुरत येथे खाजगी नोकरी करत होता. आरोपी हे फिर्यादीला लग्नात हुंडा दिला नाही तसेच तिला काम धंदा येत नाही, लग्नात मानपान केला नाही म्हणून त्रास देत होते. आरोपिंनी फिर्यादीला गाडी घेण्यासाठी ०३ लाख रुपयांची मागणी केली.तिला त्रास होत असल्यामुळे तिने महिला तक्रार निवारण केन्द्र बुलडाणा येथे तक्रार दिली. त्यानंतर फिर्यादीने चिखली पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

०३. प्रथम खबर देणार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिस स्टेशन,

चिखली येथे आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२),(३), सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा क्रमांक ५८४/२०२४ नोंदविण्यात आला. घटनेचा पुढील तपास पो.हे.कॉ. लक्ष्मण जाधव यांचेकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान तपासी अमंलदाराने पंचासमक्ष घटना स्थळावर जावून घटनास्थळ पंचनामा केला व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपीला अटक केली व तपासाअंती आरोपी विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२), सह कलम ३(५) अन्वये या न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

०४. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम८५, ११५(२), ३५२, ३५१(२),(३), सह कलम ३(५) अन्वये निशाणी क्र.२४ वर दोषारोप नोंदवून त्यातील मजकूर आरोपींना समजावून सांगीतला. आरोपींनी गुन्हा नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली.

०५. अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन कोणतीही गुन्हादर्शक परिस्थिती न्यायालया समोर न आल्याने आरोपींचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती आर. एस. जाधव व आरोपीचे वकील श्री.डी.व्ही.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. अभिलेखावरील पुरावा आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला असता खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचारार्थ असून त्यावरील निष्कर्ष व कारणे खालील प्रमाणे देण्यात आली.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे का की, दिनांक ०५.०७.२०२४ ते दि. १०.०८.२०२४ चे दरम्यान मौजे पिंपळगांव देवी, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे आरोपिंनी सामाईक उद्देशाचे पूर्ततेकरीता आरोपी क्र.०१ याने पती या नात्याने व इतर आरोपी क्र. २ ते ६ यांनी आरोपी क्र.१ चे नातेवाईक या नात्याने फिर्यादीला गाडी घेण्यासाठी रुपये ३,०००००/– ची बेकायदेशीर मागणी करुन तिचा शारीरिक व मानसीक छळ केला व त्यायोगे आरोपींनी भा. न्या. सं. २०२३ चे कलम ८५ सहकलम ३(५) प्रमाणे गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| २. | असे की, वरील दिनांकास, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी फिर्यादीला दुखापत करण्याचे उद्देशाने लाथा बुक्यांनी मारहाण केली आणि त्यायोगे भा. न्या .सं. २०२३ चे कलम ११५(२), सह कलम १९० अन्वये गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ३. | असे की, वरील दिनांकास, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस सामाईक उद्देशाने पूर्तीकरीता शिविगाळ करुन प्रक्षोभित केले व प्रक्षोभामुळे त्यांचेडून सार्वजनिक शांतोतेचा भंग व्हावा किंवा | |

| | | |
|---|---|---|
| | अन्य कोणताही गुन्हा व्हावा अशा उद्देशाने अपमान केला आणि त्यायोगे भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३५२, सह कलम १९० अन्वये गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ४. | असे की, वरील दिनांकास, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस सामाईक उद्देशाने पूर्तीकरीता फिर्यादीला मारण्याची धमकी दिली आणि त्यायोगे भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३५१(२)(३), सह कलम १९० अन्वये गुन्हा केला | **.... नकारार्थी** |
| ५. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**: कारणमिमांसा :**

०८. अभियोग पक्षातर्फे खालीलप्रमाणे साक्षीदार तपासण्यात आले.

| **साक्षीदार** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | उज्वला अरुण मतकर | फिर्यादी |

०९. आरोपी व फिर्यादी यांनी सदरचे प्रकरण आपसात करण्याकरीता परवानगी मिळण्याकरीता अर्ज नि.क.३१ दाखल केला. फिर्यादीने नि.क्र.३५ वर पुरसीस देवून प्रकरण पुढे चालविणे नसल्याचे नमूद कले आहे. आरोपी विरुद्ध गुन्हा तडजोड पात्र नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला. फिर्यादीने

अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष नोंदविली नसल्यामुळे तसेच आरोपींच्या वतीने घटनास्थळ पंचनामा मान्य केले तरी सदर दस्तांच्या आधारे आरोपीं विरुद्ध गुन्हा सिद्ध होत नाही. म्हणून अभियोगपक्ष आरोपीं विरुद्ध दोषारोप सिद्ध करु शकलेला नाही. नि.क्र.१ वर आदेश करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ करीता</u>**

१०. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले सा.क्र. १ उज्वला अरुण मतकर यांनी असे कथन केले की, आरोपी हे तिचे पती आहेत. आरोपी क्र.२ व ३ सासु–सासरे व आरोपी क्र.४ व ५ हे तिचे दिर आहेत व आरोपी क्र.६ मावस सासरे आहेत. तिचे लग्न २०११ मध्ये पिंपळगांवदेवी सराई, ता. मोताळा,जि. बुलडाणा येथे झाले. लग्नसंबंधातून तिला एक मुलगा व एक मुलगी आहे. लग्नांतर ती पिंपळगांवदेवी सराई येथे तिचे पतीचे घरी नांदायला गेली होती. तिचे सासरच्या लोकांनी तिला सुरवातीला चांगली वागणुक दिली परंतु त्यानंतर ते तिला त्रास देत होते. आता तिला तिचे सासरच्याकडून कुठलीही तक्रार नाही. तिने रागाच्या भरात त्यांचे विरुद्ध रिपोर्ट दिला असल्याचे ती सांगते.

११. साक्षीदार हि तिच्या मूळ फिर्यादशी सुसंगत अशी साक्ष नोंदवित नसल्यामुळे सरकारी वकीलांनी तिला सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी दिल्यानंतर विचारण्यात आलेल्या प्रश्नांमधून घटना सिद्ध होण्याच्या अनुषंगाने त्यांनी कोणतेही महत्वाचे बयाण दिले नाही. तसेच सरकार पक्षास मदत होईल असा कोणताही सबळ पुरावा दिलेला नाही. फिर्यादीने तिला आरोपींनी गाडी घेण्यासाठी माहेरवरुन तिन लाख रुपयाची मागणी करुन तिचा शारीरिक व मानसिक छळ केला,तिला शिविगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली याबाबत स्पष्टपणे काहीही सांगीतले नाही.

१२. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीने घटनेबाबत काहीही न सांगीतल्यामुळे आरोपी विरुद्ध कोणताही पुरावा आला नाही. आरोपीने फिर्यादीला तिन लाख रुपयाची मागणी करुन तिचा शारीरिक व मानसिक छळ केला,तिला शिविगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली असे काही स्पष्टपणे सांगीतलेले नाही. अभियोग पक्षाच्या कथनानुसार घटना ही दि.०५.०७.२०२४ रोजीची असून आरोपिंनी फिर्यादीला तिन लाख रुपयाची मागणी करुन तिचा शारीरिक व मानसिक छळ केला,तिला शिविगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणात आरोपींच्या वतीने घटनास्थळ पंचनामा मान्य केले तरी केवळ सदर दस्ताच्या आधारे आरोपीं विरुद्ध गुन्हा सिद्ध होत नाही. अभियोगपक्ष आरोपी विरुद्ध दोषारोप सिद्ध करु शकलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर "नकारार्थी" देण्यात येते.

**मुद्दा क्र. ५ करीता**

१३. मुद्दा क्र. १ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे या खटल्याचे अपील झाल्यास आरोपीची उपस्थिती मा. वरिष्ठ न्यायालयात राखण्याकरीता त्यांचे कडून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे जामीन बंधपत्र घेण्यात येत आहे. करिता मुद्दा क्र.५ चे उत्तर मी खालील आदेशाप्रमाणे नोंदवित आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.१ अरुण सुभाष मतकर, क्र.२ सौ. उषा सुभाष मतकर क्र.२, क्र.३ सुभाष नियाराम मतकर, क्र.४ गजानन सुभाष मतकर, क्र. ५ गणेश सुभाष मतकर, क्र.६ बाळु हरी गायकवाड, यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे

कलम २७१(१) अन्वये भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ८५,११५(२), ३५२, ३५१(२),(३),सहकलम ३(५) या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रुपये १५,०००/– चे जामीन व बंधपत्र दयावे.

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.05.02 17:19:48 +0530

स्थळ – चिखली
दिनांक ०२.०५.२०२६

( **श्रीमती एस. एच. उके** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२ चिखली.

**भाग "क"**

**अभियोजन / आरोपीतर्फे / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार**

| **साक्षीदार** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | उज्वला अरुण मतकर | फिर्यादी |

**ब. आरोपी तर्फे साक्षीदार**

| **साक्षीदार क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| | –निरंक– | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | –निरंक– | |

## अभियोजन / आरोपीतर्फे / न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोजन पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| नि.क्र.३३ | रिपोर्टवरील सही |
| नि.क्र.३४ | प्रथम खबर अहवाल यावरील सही |
| नि.क्र.३६ | आरोपीने मान्य केलेला घटनास्थळ पंचनामा |

### ब. आरोपी तर्फे पुरावा

| साक्षीदार | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | .. | |

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | –निरंक– | |

### क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | –निरंक– | |

**ड. मुद्देमाल**

| अ. क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| | | |

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.05.02 17:19:40 +0530

स्थळ – चिखली
दिनांक ०२.०५.२०२६

( **श्रीमती एस. एच. उके** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२ चिखली.

# ***C E R T I F I C A T E***

| | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this PDF file Judgment / order are same word for word, as per original order. | | |
| Name of the Stenographer | : | S.B. Deshpande, Grade-3, |
| Name of the Court | : | J.M.F.C. Court, (Court No.2) Chikhali |
| Dated | : | 02.05.2026 |
| Order uploaded on | : | 02.05.2026 |